**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सिंचनावरील चर्चेला परवानगी न मिळाल्याबाबत**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मागच्या आठवड्यातील दोन तीन दिवस आम्हा विरोधकांना नियमात असलेल्या चर्चेला परवानगी मिळत नाही, सरकारकडून दबाब येतो असे आमचे म्हणणे आम्ही वारंवार मांडत आहोत आणि आम्हाला असे वाटते की, विरोधकांवर दबाव निर्माण करण्यासाठी सन्माननीय सदस्यांचे निलंबन सुध्दा होत राहिले......

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा कोणता मुद्दा आहे ?

**सभापती** : सभागृहात कोणतेही कामकाज सुरु नसल्यामुळे कोणतीही ऑर्डर नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला फक्त एवढेच निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, सत्ताधारी आणि विरोधक मिळून हे विधिमंडळ चालणे अपेक्षित असताना विरोधकांची अशी मुस्कटदाबी होणे योग्य नाही. काल आम्ही ही गोष्ट माननीय राज्यपालांच्या कानावर घातलेली आहे. जोपर्यंत नियमानुसार सिंचनावर मागितलेल्या चर्चेला परवानगी मिळत नाही किंवा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेत नाही तोपर्यंत आम्ही सभागृहात खाली बसून धरणे देणार आहोत एवढे आपल्याला सांगण्यासाठी आम्ही उभे राहिलेलो आहोत. बाकी सत्ताधारी पक्ष आणि आपल्याला जे काही कामकाज चालवावयाचे असेल ते चालू द्या.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसतात )

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना आणि सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, संसदीय पध्दतीप्रमाणे आपण सभागृहामध्ये खाली बसणे योग्य नाही तसेच ते संसदीय परंपरेलाही शोभादायक नाही. त्यामुळे आपण खाली न बसता आपापल्या आसनावर बसावे आणि त्या ठिकाणाहून जसे विरोधी पक्ष नेत्यांनी आपले विचार मांडले त्याप्रमाणे आपल्याला जे काही विचार मांडावयाचे आहेत, आपल्या ज्या काही भावना व्यक्त करावयाच्या आहेत त्या व्यक्त कराव्यात. आता खरे म्हटले तर सभागृहाचे कामकाज सुरु नसताना सन्माननीय विरोधी पक्ष

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

**सभापती** ......

नेत्यांनी त्यांच्या भावना मांडल्या. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ज्या भावना मांडल्या त्याचा मी आदर करणे आवश्यक आहे परंतु नियमाप्रमाणे सभागृहात कोणतेही कामकाज सुरु नसताना आपण अशा पध्दतीने जे विचार मांडतो ते टाळण्याचा प्रयत्न करावा.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आपल्या सभागृहाचे कामकाज दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या सहभागाने चांगल्या पध्दतीने चालावे अशीच आमच्या सत्ताधारी बाजूच्या सर्व सन्माननीय सदस्यांची मनापासूनची इच्छा आहे. आपले जे काही प्रश्न असतील त्याबद्दलची सोडवणूक कशी करावी याबाबत आपल्याला संसदीय पध्दतीने मार्ग निश्चितपणे काढता येऊ शकतो. तसा प्रयत्नही आपण करु. परंतु वारंवार सभागृहाचे कामकाज बंद राहणे जनतेच्या दृष्टीने सुध्दा फारसे चांगले नसल्यामुळे माझी सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सर्वांना मनापासून विनंती आहे की, आपण जर सहकार्य देऊ केले तर निश्चितपणे मागच्या आठवड्यात झालेला सर्व भाग बाजूला सारुन आपण नव्याने एका चांगल्या पध्दतीने या कामकाजाचा दर्जा वाढवू या. आपण मनापासून सहकार्य करावे अशी मी सत्ताधारी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने आपणा सर्वांना विनंती करतो.

**सभापती** : सभागृहाचे कामकाज सुकरपणे चालावे या दृष्टीने मी सत्तारुढ आणि विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना, विरोधी पक्ष नेत्यांना, गट नेत्यांना माझ्या दालनामध्ये सलग दोन किंवा तीन वेळा बोलविले होते. त्या ठिकाणी चर्चाही झाली. पण ती झालेली चर्चा सभागृहात आल्यानंतर टिकत नाही अशी खरी परिस्थिती आहे. तसेच नियम 269 अन्वये जो प्रस्ताव होता

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/ पूर्वी श्री.बरवड 11:05

**सभापती**........

तो सलग दोन दिवस चर्चेला येऊन सुध्दा, अनेक प्रयत्न करुन सुध्दा, माझ्या दालनामध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बोलविल्यानंतरही त्या प्रस्तावावरील चर्चा पूर्ण होईल अशी परिस्थिती निर्माण झाली नाही. कोणी परिस्थिती निर्माण केली ? मला असे वाटते की, एका निरीक्षणानुसार दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या सहकार्याने चर्चा करीत असताना काही वेळा सभागृहामध्ये नकळत गोंधळ होत असतो. अशी परिस्थिती तेव्हा निर्माण झाल्याने ती चर्चा पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे आपली इच्छा असताना सुध्दा आपण चर्चा पूर्ण करु शकलो नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपण नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेचा उल्लेख केला आहे. त्या प्रस्तावाबाबत दोन दिवस सदनामध्ये चर्चा सुरु होती किवा त्याबाबत गोंधळ झाल्याने एक निर्णय घेण्यात आला होता. या सार्वभौम सभागृहामध्ये एखादा निर्णय घेतल्यानंतर त्याचे पालन करण्याचे संकेत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी या विषयाबाबत ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेण्यात यावे असे मत मांडले होते. त्यावेळी आपण असे म्हटले होते की, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना माझ्या अधिकाऱ्यांकडून तपासून घेतल्यानंतर मी निर्णय घेईन. एकाच विषयाला घेऊन वारंवार चर्चा उपस्थित केल्यामुळे समज गैरसमज झाला असावा असे माझे स्वत:चे मत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सुरुवातीलाच त्यांच्या वक्तव्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, लोकशाही दोन चाकावर चालते. फक्त सत्ताधारी पक्षाच्या बाकावरुन लोकशाही चालत नाही. विरोधी पक्षाने सक्षमपणे सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेणे आवश्यक आहे, किंबहुना, ते अनिवार्य आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी व्यक्त केलेल्या मताचे मी समर्थन करतो. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना आणि सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, ज्या मुद्यावर आपली चर्चा थांबली होती, तेथून पुढे ही चर्चा कशी नेता येईल, ती चर्चा चांगली कशी होईल या दृष्टीकोनातून या ठिकाणी आपली मते मांडावीत.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये कोणत्याही सन्माननीय सदस्यांना आक्षेप मांडण्याला परवानगी न देता प्रश्नोत्तराचा तास पूर्ण केला जातो. त्यानंतर सन्माननीय सदस्यांना जर काही विचार मांडावयाचे असतील तर त्यांनी जरुर मांडावेत, माझी त्याला हरकत नाही. मी पुन्हा एकदा सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, या सदनामध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत बोलत असताना सन्माननीय विरोधी पक्ष नेते व सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे अशी आपण त्यांना विनंती केलेली आहे. आपण असाही उल्लेख केला आहे की, दोन दिवसापूर्वी सभागृहामध्ये नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा सुरु असताना या संदर्भातील नियमातील तरतूद सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्यानंतर त्या प्रस्तावावरील चर्चा पूर्ण होऊ शकली नाही. त्यानंतर आपल्या दालनामध्ये 2-3 वेळा चर्चाही झालेली आहे. त्यानंतरही तो प्रश्न सुटलेला नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे आणि सन्माननीय सदस्यांचे चर्चेअंती समाधान झालेले नाही असे मला स्वत:ला वाटते. सभापती महोदय, लोकशाहीमध्ये भारतीय घटनेनुसार सार्वभौम सभागृहाच्या कामकाजाबाबत नियम तयार करण्यात आलेले आहेत. सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी हे नियम आहेत. सभागृहाचे कामकाज बंद करण्यासाठी हे नियम केलेले नाहीत.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे...

आपण सभागृहामध्ये वेगवेगळया आयुधांचा वापर करुन कामकाज करीत असतो. जर नियमानुसार आपल्याला एका आयुधामार्फत चर्चा करता येत नसेल तर दुस-या आयुधाचा वापर करुन आपणाला या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित करता येते. या सदनामध्ये चर्चा उपस्थित करण्याचे विविध मार्ग आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, हे सार्वभौम सभागृह चालू राहिले पाहिजे. या ठिकाणी जनतेचे प्रश्न मांडले गेले पाहिजेत. सभागृह हेच जनतेचे प्रश्न सोडविण्याचे माध्यम आहे. या माध्यमाचा उपयोग सभागृहामध्ये खाली बसून, मार्गिकेमध्ये बसून होणार नाही. यामध्ये कमीपणाचा प्रश्न निर्माण होत नाही. सन्माननीय सदस्यांना नियमानुसार एखाद्या आयुधावर चर्चा करता येत नसेल तर अन्य कोणत्या ना कोणत्या आयुधांचा मार्ग स्वीकारुन सभागृहामध्ये चर्चा उपस्थित करता येते आणि तो प्रयत्न माझ्या समोरच्या मित्रांनी केला पाहिजे. सभागृहामध्ये चर्चा करायला मिळाली नाही म्हणून आपण पायरीवर बसणार का, सभागृहामध्ये मार्गिकेमध्ये बसणार का, याचा विचार केला पाहिजे. या ठिकाणी विचारमंथनातून जनतेला न्याय देण्यासाठी या सभागृहाचा उपयोग झाला पाहिजे असे मला वाटते.

गेली अनेक वर्षे मी या विधिमंडळामध्ये काम करीत आहे. असे अनेक प्रसंग निर्माण झाले परंतु त्या प्रसंगातून मार्ग काढण्यात आले आणि सभागृहाचे कामकाज सुरुळीत चालले. एखाद दुसरा दिवस सभागृह बंद पडले असेल परंतु नंतर सभागृह सुरळीत सुरु झाले. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांना मी विचारु इच्छितो की, आपण हा जो काही मार्ग स्वीकारलेला आहे तो लोकशाहीच्या कक्षेमध्ये बसतो काय ? आपण या ठिकाणी जनतेच्या समस्या, अडचणी, प्रश्न सोडविण्यासाठी, त्यांना न्याय देण्यासाठी आलो आहोत. हे काम खाली बसून आणि न बोलून होईल काय, हा विचार केला पाहिजे. कदाचित आपण असेही म्हणाल की, या सभागृहामध्ये श्री. नारायण राणे यांनी कामकाजासंबंधीचा नियम सांगितला म्हणून हे सगळे झाले. सभापती महोदय, मी विधानसभेचा सदस्य आणि मंत्री म्हणून या ठिकाणी कामकाजासंबंधीचा नियम सांगितला. या सभागृहामध्ये एखादा प्रश्न निर्माण झाल्यानंतर, सभागृहाचे कामकाज नियमाने चालले पाहिजे, प्रथा आणि परंपरेने चालले पाहिजे म्हणून माननीय सभापतींच्या नजरेला एखादी बाब आणून देणे यामध्ये काही चूक नाही किंवा त्यामागे माझा काही वेगळा हेतू नाही. ते माझे कर्तव्य होते आणि ते कर्तव्य

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे....

मी पार पाडलेले आहे. त्यावर माननीय सभापतींनी जो काही निर्णय दिला त्यावर मी माझे भाष्य केलेले नाही.

सभागृहाच्या कामाकाजासंबंधीची नियम पुस्तिका आहे. या सभागृहामध्ये नियमानुसार कामकाज झाले तरच ते होऊ शकेल. महाराष्ट्रातील साडेअकारा कोटी जनतेला न्याय द्यावयाचा असेल तर नियम, प्रथा, परंपरा सांभाळून कामकाज केले तर जनतेला न्याय देता येईल.एखाद्या प्रश्नावर टीका करणे हा तुमचा अधिकार आहे. परंतु ही टीका आकसाच्या आणि सूडाच्या भावनेतून असता कामा नये, ती मार्गदर्शनाच्या स्वरुपात असली पाहिजे या मताचा मी आहे. कोणावर तरी सूड उगविण्याच्या भावनेतून, त्याला आयुष्यातून उठविण्याच्या भावनेतून टीका करण्याचा कोणाचा उद्देश असता कामा नये. आपल्या भाषणातून, विचारातून समोरच्यांना मार्गदर्शन झाले पाहिजे, खात्याला मार्गदर्शन झाले पाहिजे आणि त्या माध्यमातून जनतेला न्याय मिळाला पाहिजे यादृष्टीने जेव्हा या सभागृहामध्ये विचारमंथन होईल त्याच वेळी जनतेला न्याय मिळू शकेल. हे प्रयत्न प्रत्येकाने करणे आवश्यक आहे.

आपण काहीही ठरवून आला असलात तरी माझ्या समोरच्या सहकारी मित्रांना मी विनंती करतो की, माननीय सभापतींनी जी विनंती केलेली आहे तिचा आपण सर्वजण आदर करुन चर्चेमध्ये सहभागी व्हावे. जे काही प्रश्न असतील ते आपण चर्चेतून सोडवू. परंतु अशा रीतीने आपण सभागृहामध्ये खाली बसणे आणि आम्ही वर बसणे योग्य वाटत नाही. तुम्ही सर्वजण आमच्या बरोबरीचे आहात, मित्र आहात, सहकारी आहात. त्यामुळे सभागृह अशा अवस्थेमध्ये चालू ठेवणे इष्ट नाही. तेव्हा आमच्या भावनांचा आणि नियमांचा आदर करुन विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर बसतील आणि सभागृहापुढील कामकाज करायला सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे...

सभागृहातील कामकाज चालू ठेवण्याची जबाबदारी सत्ताधारी तसेच विरोधी पक्षाची आहे. सभागृहाचे कामकाज चालू ठेवण्याचे काम फक्त सत्ताधारी पक्षाचे नाही. लोकशाहीच्या माध्यमातून सभागृहाचे कामकाज होण्याच्यादृष्टीने विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सहकार्य करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

**सभापती** : सन्माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांनी या ठिकाणी भावना व्यक्त केल्या आहेत. सत्तारुढ पार्टी आणि विरोधी पक्षाची पार्टी ही लोकशाहीची दोन चाके आहेत. ती दोघी चाके व्यवस्थितपणे चालावित यासाठी आपण सर्व प्रयत्नांची पराकाष्टा करीत असतो. दिनांक 24 आणि दिनांक 25 जुलै, 2013 रोजी अशाच प्रकारची प्रयत्नांची पराकाष्टा केली आहे. त्या दिवशी नियम 260 चा प्रस्ताव अत्यंत व्यवस्थितपणे चालावा, त्यावरील चर्चा पूर्ण व्हावी याकरिता आपण प्रयत्न करीत होतो. प्रस्तावाच्या सुरुवातीस सदस्यांकडून काही शाब्दिक अडथळे आलेत. दिनांक 25 जुलै, 2013 रोजी या प्रस्तावाच्या अनुषंगाने मी माझ्या दालनात किमान दीड ते दोन तास आपणा समवेत चर्चा केली. दुर्देवाने ती चर्चा यशस्वी होऊ शकली नाही. त्यानंतर या प्रस्तावाच्या चर्चेला सभागृहात एक वेगळे वळण लागले. माझी विरोधी पक्ष सदस्यांना विनंती आहे की, आतापर्यंत सभागृहात अनेक वेळा असे प्रसंग आले. ते प्रसंग खेळीमेळीच्या वातावरणात सोडविण्यात आपण यशस्वी झालेलो आहेत. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी प्रश्नोत्तराच्या तासाच्या कामकाजात भाग घेऊन मला सहकार्य करावे. तसेच सभागृहासमोरील अन्य कामकाज करण्यामध्ये देखील सहकार्य करावे व सभागृहात एक नवीन वातावरण निर्माण करण्यास आपण सर्वांनी मदत करावी. आता मी तारांकित प्रश्न क्रमांक 43155 पुकारीत आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>तारांकत प्रश्न क्रमांक 43155</u>**

( प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही. )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

## राज्यातील अंगणवाड्यांमधील सेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२) * ४३१८६ ॲड.जयदेव गायकवाड, डॉ.निलम गोऱ्हे, श्री.दिवाकर रावते, श्री.सतीश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.एम.एम.शेख, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विनायकराव मेटे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायक राऊत, श्री.मनीष जैन, डॉ.सुधीर तांबे, श्री.नितीन गडकरी, श्री.नागो गाणार, श्री.विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३००० अंगणवाड्यांमध्ये एकूण १३,४४६ पदे २ वर्षापासून रिक्त असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पदे रिक्त असल्यामुळे अंगणवाड्या बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अंगणवाड्या बंद होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने अंगणवाड्या बंद पडू नयेत याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड** : (१) अंशत: खरे आहे.

माहे मार्च, २०१३ च्या मासिक प्रगती अहवालानुसार राज्यात अंगणवाडी कर्मचाऱ्यांची १३११९ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

अंगणवाडीमध्ये रिक्त पदांवर शेजारील अंगणवाडी सेविकांना अतिरिक्त कार्यभार देऊन अंगणवाड्या चालविल्या जात आहेत.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

४...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, राज्यामध्ये अंगणवाडी सेविकांची गेल्या दोन वर्षापासून 13,446 पदे रिक्त आहेत.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसलेले असताना सभागृहाचे कामकाज चालवू नये. सन्माननीय विरोधी पक्ष सदस्यांनी कामकाजात सहभाग घ्यावा म्हणून आपणाकडून प्रयत्न व्हावेत, त्यांना पुन्हा एकदा संधी द्यावी. तद्नंतर आपण जो काही निर्णय द्याल, तो आम्हाला मान्य राहील. म्हणून आपणाकडून यासंदर्भात प्रयत्न व्हावेत यासाठी सभागृहाचे कामकाज काही वेळेसाठी तहकूब करण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.15 ते 11.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 05 मिनिटांपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.33 ते दुपारी 12.05 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसलेले असतात.)**

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : माननीय सभापती महोदयांनी शासनाच्या वतीने विरोधी पक्ष नेत्यांना, सर्व सन्माननीय गट नेत्यांना तसेच विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना विधिमंडळाच्या परंपरेप्रमाणे कामकाज चालविण्यासाठी सहकार्य करावे अशी विनंती केलेली आहे. विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी आसनस्थ व्हावे व सभागृहाच्या कामकाजात भाग घ्यावा अशी मी आपल्याला पुन्हा एकदा विनंती करतो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसलेले असतात.)**

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

**तालिका सभापती** : आज नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या 3 सूचना प्राप्त झालेल्या असून पहिली सूचना सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत,श्री. रामदास कदम, डॉ. नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, सन्माननीय सदस्य श्री. गोपिकिशन बाजोरिया, श्री. विनायक राऊत, वि.प.स. यांनी "राज्यातील कुपोषणावर मात करण्यासाठी अनेक योजना राबवूनही परिस्थिती गंभीर असणे, मुंबईपासून 80 ते 90 कि.मी. अंतरावरील ठाणे आदिवासी भागातील जव्हार-मोखाडयात शासकीय अहवालानुसार जून-जुलै, 2013 मध्ये 28 बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू होणे" या विषयाच्या संदर्भात दिलेली आहे. त्या सूचनेतील विषय आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबीशी निगडित नसल्यामुळे या सूचनेस माननीय सभापती महोदयांनी अनुमती नाकारलेली आहे.

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दुसरी सूचना सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सर्वश्री रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, श्री. जयंत प्र.पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, श्री. विजय उर्फ भाई गिरकर, ॲड. अनिल परब, श्री. रामनाथ मोते, ॲड. आशिष शेलार, डॉ. रणजित पाटील, श्री. भगवान साळुंखे, श्री. नागो पुंडलिक गाणार, श्री. विनायक राऊत वि.प.स. यांनी "संपूर्ण विदर्भामध्ये जून व जुलै महिन्यामध्ये सरासरीपेक्षा 150 ते 200 टक्के पाऊस पडल्याने शेतकऱ्यांची प्रचंड प्रमाणात जिवीत व वित्तहानी होणे, 24 तासात 65 मिमी पेक्षा जास्त पाऊस पडल्यास अतिवृष्टी जाहीर करण्यासाठी 1983 चे परिपत्रक असतांना, अद्यापपर्यंत अतिवृष्टी झाल्याचे जाहीर करण्यात न येणे"....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची जी सूचना दिलेली आहे ती फार महत्वाची आहे. माननीय विरोधी पक्ष नेते तसेच माननीय विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य या चर्चेत आज सहभागी होऊ शकणार नसल्याबद्दल मला दु:ख होत आहे. हा विषय फार महत्वाचा असल्यामुळे आजची नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना आज न मांडता उद्या मांडली जावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सभागृहापुढे महत्त्वाचे विषय आहेत. सर्व विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांना सभागृहाचे कामकाज चालविण्यासंबंधात सर्वांनी विनंती केली आहे. तरी देखील ते कामकाज चालवू देत नाहीत. मग आम्ही येथे कशाला यायचे ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ही प्रस्तावाची सूचना राखून ठेवावी असे मला वाटते.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव हा ओल्या दुष्काळासंबंधातच आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी सन्माननीय विरोधी नेते श्री.विनोद तावडे यांच्यासह विरोधी पक्षातील सर्व माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी सभागृहाच्या कामकाजात सहभागी होऊन कामकाजास सुरूवात करावी. मधल्या दोन दिवसांच्या काळात आम्ही सांगितले होते की, महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या भागात अतिवृष्टी झाली आहे. या अतिवृष्टीच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मदत व पुनर्वसन मंत्री यांनी अमरावती व नागपूर विभागांची एकत्रित बैठक घेतली. त्या भागांचा दौरा केला आहे. चंद्रपूर, वाशिम व अमरावती जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागांमध्ये आम्ही जाऊन आलो आहोत. हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे.

गेल्या आठवड्यामध्ये सिंचनासंबंधी चर्चा झाली. सिंचनाची चर्चा सत्ताधारी पक्ष जाणीवपूर्वक होऊ देत नाही अशा प्रकारचा एक मेसेज देण्याचा प्रयत्न चालला आहे. तो अतिशय चुकीचा आहे. मी आपल्याला विनंती करतो की, उद्या सकाळी दहा वाजता सिंचनाच्या विषयासंबंधी चर्चा करण्यासाठी विशेष बैठक घेण्यात यावी. सकाळी दहा ते बारा या कालावधीत बैठक घेण्यात यावी. विरोधी पक्षाला चर्चेसाठी एक तास व सत्ताधारी पक्षाला माननीय मंत्र्याच्या उत्तरासह एक तास वेळ द्यावा.

दोन्ही बाजू कडील सन्माननीय सदस्यांना राज्यात झालेल्या अतिवृष्टी विषयी चर्चा करावयाची आहे. राज्यात अतिवृष्टी झाली असल्यामुळे सरकारला देखील त्याला उत्तर द्यावयाचे आहे. काल वेगवेगळ्या ठिकाणी प्रेस कॉन्फरन्सच्या निमित्ताने प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाचे प्रतिनिधी विचारत होते त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि मी देखील सांगितले की, आता आम्ही बाहेर काहीही सांगितले तर तो सभागृहाच्या विशेषाधिकाराचा भंग होऊ शकतो. यासंबंधात राज्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सरकारला जी काही भूमिका घ्यायची आहे ती सोमवारी सभागृहात सर्वांच्या समक्ष राज्याचे प्रमुख सादर करतील. ती चर्चा आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आली आहे. त्या चर्चेला आपण सुरूवात करावी आणि सिंचनासंबंधातील चर्चा उद्या सकाळी नियमाच्या अधीन राहून करण्याकरिता आमची मनापासून तयारी आहे. नुसती हीच चर्चा नाही तर कुठल्याही चर्चेला सरकारची तयारी आहे.

(माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे आपल्या जागेवर आसनस्थ होतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सिंचनावरील चर्चा सत्ताधारी पक्ष होऊ देत नाही असे आम्ही एवढ्याकरिताच म्हणालो आहोत की, सभागृहासमोर जो प्रस्ताव दिला होता त्यातील ऑब्जेक्शनेबल शब्द काढले. त्यानुसार चर्चा करण्याचे ठरले. ही चर्चा सुरू देखील झाली. पुन्हा एक मुद्दा उपस्थित करण्यात आला व मान्य झाला. तो मुद्दा आमच्या येथून मांडला असता तर आम्ही म्हटले असते की, चर्चा विरोधकांनी थांबविली. चर्चा करावयाची असे आधी ठरले होते. परंतु, सत्ताधाऱ्यांनी नियम दाखविला. हा विषय तेवढ्या पुरताच होता. नियम 260 अन्वये सिंचनावरील चर्चा दोन तास घ्यायची की, साडेतीन तास घ्यायची हे आपण ठरवू शकतो. या चर्चेच्या निमित्ताने माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन झाले आहे. हे शंभर टक्के खरे आहे की, त्यांनी कोणताही अपशब्द वापरलेला नसून त्यांच्या आवाजाचा पारा मोठा होता. त्यांना हे जाणवल्यानंतर त्यांनी स्वत: दिलगिरी देखील व्यक्त केली आहे. दालनामध्ये सिंचना विषयी चर्चा सुरू असताना ती घटना घडली. त्यामुळे त्यांचेही निलंबन मागे घ्यावे अशी मी विनंती करीत आहे. म्हणजे मग आम्हाला कामकाज करता येईल. मी माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांना सांगू इच्छितो की, आज आम्ही कुठलेही कामकाज अडवून ठेवलेले नाही. आपणाला विरोधकांशिवाय कामकाज करावयाचे असेल तर ते करावे. आम्हाला कामकाज अडवायचे नाही. राज्यातील प्रश्न आपण सोडवावेत त्याबद्दल आमचे काहीही म्हणणे नाही. विरोधकांच्या हक्कावर गदा आणली आहे, त्यांची मुस्कटदाबी करण्यात येत आहे याचा आम्ही महात्मा गांधी यांनी दिलेल्या मार्गानुसार धरणे धरून जात आहोत. चर्चा होण्यासाठी आपण पुढाकार घेतला

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

ही स्वागतार्ह बाब आहे. आपण सन्माननीय सदस्यांचे निलंबन मागे घेतले तर आम्ही सर्व विरोधक या चर्चेला तयार आहोत. आम्ही ओल्या दुष्काळाच्या चर्चेला देखील तयार आहोत. तसेच या चर्चेला देखील आम्ही तयार आहोत. तेव्हा सन्माननीय सदस्यांचे निलंबन मागे घ्यावे एवढीच विनंती मी माननीय सभापती महोदयांना करीत आहे.

(माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे पुन्हा वेलमध्ये येऊन बसतात.)

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )**: सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्री.जयंत प्र.पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.विजय उर्फत भाई गिरकर, ॲड.अनिल परब, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री भगवानराव साळुंखे, नागो पुंडलिक गाणार व विनायक राऊत, वि.प.स. यांनी "गेल्या दीड वर्षात प्रत्येक अधिवेशनामध्ये सिंचनाच्या विविध गैरव्यवहार सभागृहात पुराव्यानिशी सभागृहात मांडून देखील साधी चौकशी करण्याची बाब देखील सभागृहात मान्य करण्यात न येणे" या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

या विषयाच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री व सभागृहाचे नेते यांनी आताच शासनाची भूमिका सांगितलेली आहे. ही प्रस्तावाची सूचना माननीय सभापतींनी नाकारलेली आहे.

(विरोधी पक्ष नेते तसेच विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून असतात)

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "रायगड जिल्ह्यातील मच्छीमार बोटींना सन 2011 ते 2013 अखेरची रुपये 20 कोटींची परताव्याची रक्कम न मिळाल्यामुळे मच्छीमारांवर आलेली उपासमारीची पाळी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 चा होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र.....

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री व सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी आताच विरोधी पक्षाच्या सदस्यांना सभागृहातील कामकाजात भाग घेण्यासाठी आवाहन केले. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी देखील त्यास प्रतिसाद दिलेला आहे. जो थोडासा अडथळा आहे तो देखील दूर होऊ शकतो. आपण अशाप्रकारे कामकाज पुढे नेण्यापेक्षा पुन्हा काही समेट घडत असेल तर त्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आता जो नवीन मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या संदर्भात काही मार्ग निघत असेल तर त्यासाठी माननीय सभापतींच्या दालनात माननीय सभागृहाचे नेते, माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे व माननीय विरोधी पक्ष नेते यांनी एकत्र बसून चर्चा करावी. यातून मार्ग निघाला पाहिजे. आपण सभागृहाचे कामकाज पुढे चालवू नये, ते थांबवावे अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांनी सांगितले की, "हे सभागृह चालविण्यासाठी आहे,बंद पाडण्यासाठी नाही." "डेमॉक्रसी बाय डिस्कशन" असे आपण म्हणतो. कितीही मोठा डेडलॉक झाला तरी चर्चेने प्रश्न सुटू शकतो. या ठिकाणी दोन्ही नेत्यांनी एकमेकांना प्रतिसाद दिलेला आहे, त्यामुळे मार्ग सुटण्यास मोकळीक आहे, स्पेस आहे. आपण ही स्पेस बंद करु नये अशी माझी विनंती आहे. या बाबत चर्चा व्हावी असे सभागृहाचे देखील मत आहे आणि चर्चेने प्रश्न सुटू शकतात.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री व सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी आताच सांगितले की, सिंचनाच्या विषयावर चर्चा करण्यास आमची तयारी आहे. या चर्चेला सरकार तयार नव्हते असे कधीच नव्हते. फक्त ही चर्चा नियमानुसार झाली पाहिजे असे मत होते. ही चर्चा नियमामध्ये कशी बसत नाही हे माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांनी सांगितलेले आहे. आता सरकारने चर्चेसाठी तयारी दाखवून त्यासाठी वेळ देखील जाहीर केलेली आहे. राज्यात ओला दुष्काळ पडला म्हणून विधानसभा सभागृह बऱ्याच वेळा बंद पाडले आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

ओल्या दुष्काळामुळे विदर्भातील जनतेला न्याय मिळाला पाहिजे अशी सभागृहाची भावना असताना एका सन्माननीय सदस्यांचे निलंबन मागे घ्यावे म्हणून सभागृहास वेठीस धरले जात असेल तर ते बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांच्या गैरवतणुकीमुळे व असंसदीय शब्द वापरल्यामुळे माननीय सभापतींनी एखाद्या सन्माननीय सदस्यांना निलंबित केले असेल तर त्यासाठी सभागृहाचे कामकाज बंद पाडणे हे या सभागृहाच्या सार्वभौमत्वाला धरुन होणार नाही असे मला वाटते. तेव्हा माझी सर्व सन्माननीय सदस्यां मार्फत विनंती आहे की, आपण चर्चेला सुरुवात करावी. सभागृहाचे कामकाज सुरु केल्यानंतर सन्माननीय सदस्यांच्या निलंबनाबाबत जो काही विषय असेल त्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री व माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे व माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माननीय सभापतींकडे जाऊन विचार विनिमय करावा. परंतु त्यासाठी सभागृहाचे कामकाज बंद पाडणे बरोबर नाही.

सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने विनंती करतो की, आपण सभागृहाचे कामकाज सुरु करावे. अधिवेशनाचा हा शेवटचा आठवडा आहे. आज कामकाजपत्रिकेवर अतिशय महत्वाचे विषय आहेत. आपल्यापुढे भरपूर कामकाज आहे. तेव्हा या सर्व प्रश्नांवर चर्चा होऊन महाराष्ट्रातील जनतेला या सभागृहाच्या माध्यमातून न्याय द्यावा असे मला वाटते. तेव्हा आपण सभागृहाचे कामकाज सुरु करावे अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते म्हणतात की, विरोधी पक्ष कामकाजात अडथळा आणत नाही. विरोधी पक्ष कामकाजात अडथळा आणत नसले तरी त्यांचा सभागृहाच्या कामकाजामध्ये सहभाग असणे महत्त्वाचे आहे. सभागृहात प्रत्येक विषयावर चर्चेच्या माध्यमातून देवाणघेवाण व्हावयास पाहिजे. त्यादृष्टीने सत्ताधारी पक्षाबरोबर एक संवाद निश्चितपणे साधता आला पाहिजे ही त्यामागची भूमिका आहे. सभागृहाच्या नेत्यांनी नुकतेच आश्वस्त केले आहे की, सिंचनावरील प्रश्नासंबंधी विरोधी पक्षाची जी भूमिका होती त्या संबंधी चर्चा करण्यास सरकार तयार आहे. त्यांनी या विषयावरील चर्चेस वेळ देऊन चर्चा करण्यास सहमती दर्शविल्याबद्दल माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांचे धन्यवाद देखील मानले आहेत.

असे असले तरी एक तांत्रिक प्रश्न शिल्लक राहिला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या काही कृतीमुळे त्यांना निलंबित करण्यात आले आहे. वास्तविक पाहता सन्माननीय सदस्यांचे निलंबन झाल्यानंतर त्यावर पुढील कार्यवाही किंवा फेरविचार करण्यासाठी संसदीय कामकाज पध्दतीमध्ये नियम ठरलेले आहेत. त्यानुसार रितसर विनंती करुन माननीय विरोधी पक्ष नेते, गट नेते आणि सभागृहाचे नेते यांना माननीय सभापतींकडे एकत्र बसून त्या विषयावर चर्चा करता येईल. त्यातूनही नक्कीच मार्ग काढता येईल, असे मला वाटते. आपण म्हणता त्याप्रमाणे सत्ताधारी पक्ष सभागृहाचे कामकाज पुढे चालवू शकतो, सभागृहाचे कामकाज पुढे सुरु होऊ शकते. परंतु सभागृहाच्या कामकाजामध्ये सत्ताधारी पक्षा इतकाच विरोधी पक्षाचा सहभाग महत्त्वाचा असल्यामुळे त्यांनी हा विषय अजून न ताणता सभागृहाच्या कामकाजात सहभागी व्हावे. तसेच सभागृहाचे कामकाज आजच्या कामकाजपत्रिकेनुसार पुढे नेण्यास मदत करावी, अशी मी पुन्हा विनंती करतो.

श्री.अजित पवार : महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, रमेश शेंडगे व हेमंत टकले यांनी आपापली भूमिका मांडलेली आहे. माझी आपल्यामार्फत माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांना विनंती आहे की, या विषयावर चर्चा करण्यासाठी सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यापेक्षा त्यांनी सभागृहाचे कामकाज होऊ द्यावे. मी आणि सर्व पक्षाचे गट नेते माननीय सभापतींच्या दालनात जाऊन या विषयावर चर्चा करतो. कामकाज बंद ठेवून चर्चा करण्यापेक्षा सभागृह सुरु ठेवून कामकाज करावे, अशी सरकारची सकारात्मक भूमिका आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले की, या विषयावर चर्चा करुन मार्ग निघू शकतो. तशा प्रकारे मार्ग निघण्यासाठी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सहकार्य करावे आणि सभागृहाचे कामकाज सुरु ठेवावे. आम्ही तिघे-चौघे माननीय सभापतींकडे जाऊन त्यांच्याशी चर्चा करुन मार्ग काढतो. मी पुन्हा एकदा विनंती करतो की, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी पुढील कामकाजात भाग घ्यावा.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 च्या सूचना

(पुढे सुरु.....)

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "रायगड जिल्ह्यातील मच्छीमार बोटींना सन 2011 ते 2013 अखेरची रुपये 20 कोटींची परताव्याची रक्कम न मिळाल्यामुळे मच्छीमारांवर आलेली उपासमारीची पाळी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी "अमरावती विभागाचे समाज कल्याण आयुक्त, माधव वैद्य यांनी अधिकाराचा दुरुपयोग करुन शासनाच्या कल्याणकारी योजनेत केलेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, डॉ.रणजित पाटील यांनी "नाशिक जिल्ह्यातील मालेगांव तालुक्यातील कोळाणे (गा) येथील गुरुदेव चैतन्यरुपी जंगली महाराज हायस्कूल या शाळेच्या मुख्याध्यापिक व संस्था चालक यांनी संगनमत करुन केलेला गैरकारभार व भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार यांनी "प्रचंड महागाई वाढल्यामुळे प्रशिक्षण निधीमध्ये वाढ न झाल्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणामध्ये निर्माण झालेल्या अडचणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)**.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "वसई-विरार विकास योजनेचे गेल्या अनुक वर्षापासून प्रलंबित असलेले 76 ई.पी.तातडीने मंजूर करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "दहिसर (पूर्व) केतकी पाडा व धारखाडी येथील सर्व्हे क्र. 345 (अ) मधील 1952 च्या पूर्वीपासून अस्तित्वात असलेली महसुली गावे वनखात्यातून वगळून रेग्युलराईज करण्यासाठी तेथील ग्रामस्थांनी केलेली विनंती" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, भाई गिरकर, चंद्रकांत पाटील यांनी "मुंबई महानगरपालिका कवी केशवसुत उड्डाणपुलाखाली दादर पश्चिम येथे कार्यरत असलेल्या अपंग मैत्री या संस्थेवर लादलेले मासिक भाडे कमी करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई गिरकर, विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार, श्री. चंद्रकांत पाटील यांनी "दिंडोशी, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे समोर, गोरेगाव (पूर्व) मुंबई येथे मे. ओबेरॉय आणि आर्किटेक्ट यांच्या मार्फत हॉटेल व ऑफीससाठी इमारतीचे केलेले अनधिकृत बांधकाम" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार, डॉ. रणजित पाटील, श्री. चंद्रकांत पाटील यांनी "दिनांक 29 जुलै, 2013 रोजी शेगाव (जि. बुलढाण) येथील शासकीय समाजकल्याण वसतिगृहात राहणाऱ्या 77 मुलींना झालेली विषबाधा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

## नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने

**तालिका सभापती** : आज नियम 93 च्या सूचनेवरील 4 निवेदने आहेत ती आता चर्चेला घेण्यात येतील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, पुन्हा तोच प्रश्न उपस्थित होईल की, ज्या सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने आहेत ते सन्माननीय सदस्य उभे राहणार नाहीत. त्यांच्याशिवाय त्या विषयावरील चर्चा चालू ठेवणे प्रस्तुत होणार नाही.

श्री. नारायण राणे : विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहात वेलमध्ये बसून कामकाजात भाग घ्यावयाचा नाही, कामकाजही करावयाचे नाही हे बरोबर नाही.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**पृ.शी./मु.शी.** : शासकीय आश्रमशाळांमधील कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेतरांनी आझार मैदान येथे केलेला अन्न सत्याग्रह याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. राजेंद्र गावित ( आदिवासी विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

( उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**पृ.शी./मु.शी.** : मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील खरेदी विक्री संघाने शासकीय नियमांचे उल्लंघन करुन गणेश आळी येथे सुरु केलेले अनधिकृत बांधकाम याबाबत श्री. जयंत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सुरेश धस ( पणन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

( उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : रमेश उर्फ रम्या पवार तसेच लखनभैया या गुंडांविरुध्दच्या चकमकीच्या प्रकरणात पाच लाख रुपयांची भरपाई देण्याची शासनावर आलेली नामुष्की याबाबत सर्वश्री डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

( उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत )

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**पृ. शी./ मु.शी.** : मानधन वाढीच्या बाबतीत आदिवासी विभागातील आश्रमशाळांमधील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक सेवकांवर झालेला अन्याय याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. राजेंद्र गावित ( आदिवासी विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

( उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत )

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत**

**तालिका सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या सर्व 6 लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

( सत्ताधारी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनांच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी जो निर्णय घेतलेला आहे तो निर्णय मी या ठिकाणी जाहीर केलेला आहे.

...8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

## विशेष उल्लेख

**पृ.शी./मु.शी.** : आदिवासी जात पडताळणी कार्यालयाकडे असलेली प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची आवश्यकता याबाबत श्री. रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यात जून, 2013 अखेर आदिवासी जात पडताळणी कार्यालयाकडे एकूण 18,246 प्रकरणे जात पडताळणीसाठी प्राप्त झाली असता त्यातील 2689 प्रकरणे तपासली असता त्यातील 335 जणांनी खोटी जात प्रकरणे सादर केल्याचे उघडकीस येणे, प्रलंबित असलेली आदिवासी जात पडताळणी प्रकरणे आणि नुकतीच पडताळणी करण्यात आलेली प्रकरणे याचा विचार करता प्रलंबित प्रकरणात जातीची खोटी प्रमाणपत्रे असण्याची शक्यता असल्याने शासनाची खोट्या प्रमाणपत्राव्दारे फसवणूक होऊ नये म्हणून प्रलंबित असलेली जात पडताळणी प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास करीत आहे."

----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: राज्यातील ग्राम रोजगार सेवकांना अधिकृत नेमणूक पत्र देऊन त्यांना दरमहा वेतन देण्याची मागणी याबाबत श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येणे, योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कंत्राटी पध्दतीने विविध पदावर अधिकारी, कर्मचारी कार्यरत असणे, राज्यात गाव स्तरावर सुमारे 26 हजार ग्राम रोजगार सेवक प्रत्यक्ष गाव पातळीवर काम करणे, योजनेच्या कामात ग्राम रोजगार सेवकांची भूमिका अतिशय महत्वाची असणे, ग्राम रोजगार सेवकांना शासनाकडून साधे नेमणूक पत्रही देण्यात न येणे, आंध्र प्रदेशसह इतर राज्यात ग्राम रोजगार सेवकांना 3,500 ते 6,350 रुपये दरमहा वेतन देण्यात येणे, ग्राम रोजगार सेवक संघटनेने दरमहा वेतन देण्याची मागणी राज्य शासनाकडे करणे, दरमहा वेतनासह ग्राम रोजगार सेवकांना ग्रामपंचायतीमध्ये वेगळा कक्ष व इतर सुविधा देण्याचीही मागणी संघटनेने करणे, संघटनेने दि.24 जुलै, 2013 पासून आझाद मैदान येथे बेमुदत धरणे आंदोलन करणे, संघटनेच्या आंदोलनाची शासनाने दखल न घेणे, राज्यातील ग्राम रोजगार सेवकांना अधिकृत नेमणूक पत्र देऊन त्यांना दरमहा वेतन देण्यात यावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: लाईफ गार्ड सेवकांची भरती व अद्ययावत यंत्रसामुग्रीची उभारणी न आल्यामुळे नागरिकात पसरलेले भीतीचे वातावरण याबाबत श्रीमती विद्या चव्हाण यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"मुंबई महापालिकेने समुद्रात बुडणाऱ्यांना वाचविण्यासाठी लाईफ गार्डची भरती करण्याची घोषणा सुमारे 7 ते 8 महिन्यांपूर्वी करण्यात येऊन सदर घोषणेची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रसामुग्रीची उभारणी करण्यात न येणे, त्यामुळे मुंबईतील नागरिकात पसरलेले भीतीचे वातावरण, पावसाळ्यात मुंबईतील समुद्रात बुडून मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या वाढत असणे, लाईफ गार्ड सेवकांची भरती व अद्ययावत यंत्रसामुग्री तातडीने उभारण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मुंबईचे आद्य शिल्पकार जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेठ यांच्या सारख्या महापुरुषांचे भव्यदिव्य स्मारक उभे करणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मुंबई शहराच्या विकासाचे पाया रचणारे, भारतीय रेल्वेचे जनक, मुंबई शहराची शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय व्यवस्थापनाशी मूहूर्तमेढ रोवणारे मुंबईचे आद्य शिल्पकार जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेठ यांचे सामाजिक क्षेत्रातील कार्य हे उल्लेखनीय आहे. त्यांनी मुंबईमध्ये सन 1842 साली मुलींची शाळा काढली. मुंबई शहरातील जनतेला पायाभूत सुविधांबरोबर आरोग्य, सुखसोयी मिळण्यासाठी मुंबईलाही स्वतंत्र म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्ये रुपांतर केले गेले, अंधश्रध्दा आणि कालबाह्य चाली रिती विरोधी जनजागरण, सती कायदा बंदीसाठी प्रयत्न करणारे या नानांचा सध्या सर्वांना विसर पडलेला आहे. तरी नानांसारख्या द्रष्ट्या, लोकोत्तर, कर्मयोगी महापुरुषाचे भव्यदिव्य स्मारक उभारावे अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वाढीव वेतनाबाबत श्री.निरंजन डावखरे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.निरंजन डावखरे (ठाणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यात 28 शासकीय व खाजगी संस्थांमार्फत एकूण 43 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये चालविण्यात येत असून या विद्यालयांमध्ये सुमारे 600 शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तुटपुंज्या वेतनावर कार्यरत आहेत. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी वाढीव वेतनाबाबत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या प्रशासनाकडे वारंवार मागणी करुनही त्यांना अद्यापपर्यंत कोणताही आर्थिक लाभ देण्यात आलेला नाही. सदर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या संघटनेने शासनाचे अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण विभाग) यांना प्रत्यक्ष भेटून आपल्या मागण्यांचे निवेदन देऊन कार्यवाहीची मागणी केली. तथापि, त्यांचे प्रकरणी अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने त्यांनी दिनांक 1 ते 3 जुलै, 2013 या कालावधीत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करुन शासनाचे लक्ष वेधले आहे. असे असतानाही कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत अद्यापि कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तरी या विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वाढीव वेतनाबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे."

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: लष्करात पराक्रम करणाऱ्या सागर पटवर्धन आणि त्यांच्या टीममधील लष्करी मराठी योद्ध्यांचे अभिनंदन करुन त्यांना घर किंवा जमीन बक्षिस देणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयवंतराव जाधव ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"लष्करात पराक्रम गाजविणाऱ्यास जवानास इनाम म्हणून, पंजाप, हरियाणा, गुजरात, मध्य प्रदेश या सरकारांकडून घरे दिली जाणे, मात्र मुळचे मुंबईचे असलेले व सध्या भोपाळ येथील 6 जाट रेजिमेंटमध्ये कार्यरत असलेले सागर पटवर्धन हे सन 2008 मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये 48 रायफल्समध्ये कार्यरत होते. त्यावेळी दिनांक 23 ऑगस्ट 2000 रोजी सीमा संरक्षण करीत असताना पाकिस्तानातून घुसखोरी करणा-या अतिरेक्यांशी 6 दिवस सामना करावा लागला. या चकमकीत पहिल्या तीन तासात कमांडिंग ऑफिसर कर्नल जोजन थॉमस शहीद झालेले असताना मोहिमेची जबाबदारी श्री. सागर पटवर्धन यांच्यावर आली. महाराष्ट्रातील या बहादूर जवानाने व त्यांच्या टीमने 6 दिवस व 6 रात्री 100 चौ.कि.मी सीमेच्या परिसरात ऑपरेशन नावनार राबवून 13 अतिरेक्यांना यमसदनी पाठवून एकास जीवंत पकडले. आजवर झालेल्या लष्करी कारवाईत अतिरेकी मारण्याचा उच्चांक केलेला असलेले व लष्करात पराक्रम करणारे सागर पटवर्धन आणि त्यांच्या टीममधील लष्करी मराठी योद्ध्याचे महाराष्ट्र शासनाने अभिनंदन करावे व शक्य असल्यास त्यांना घर किंवा जमीन बक्षिस द्यावी असे मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे."

----

यानंतर श्री.शिगम....

**पृ. शी./मु. शी.** : डोंबिवलीतील सयाजी गायकवाड प्राथमिक शाळेतील व तुलसी हिंदी विद्यालयातील विद्यार्थ्यांना दिलेली मुदतबाह्य औषधे याबाबत श्री. संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"देशात बिहार आणि गोव्यात मिड डे मीलचा प्रश्न सर्वत्र गाजत असताना कल्याण डोंबिवली महापालिकेच्या डोंबिवलीतील 82 क्रमांकाच्या सयाजी गायकवाड प्राथमिक विभागाची मराठी शाळा व तुलसी हिंदी विद्यालयातील विद्यार्थ्यांना दिली जाणारी औषधे मुदत संपलेली असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलेला आहे. सभापती महोदय, पुरावा म्हणून हे औषधाचे सम्पल मी आपणाकडे पाठवित आहे. सर्व महापालिका शाळामध्ये मध्यान्ह भोजनाची योजना राबविली जाते. विद्यार्थ्यांना खिचडीचे वाटप केले जाते. मध्यान्ह भोजनानंतर विद्यार्थ्यांमध्ये प्रथिने व लोह-क्षार वाढीस लागावे म्हणून मायक्रोन्यूटीन नावाचे सिरप दिले जाते. शाळेच्या मुख्याध्यापकांनी हे निदर्शनास आणून दिले की, औषधांच्या बाटल्यांची उत्पानाची तारीख जानेवारी 2012 होती आणि त्याची मुदत मार्च 2013 पर्यंत होती. मुख्याध्यापकांनी या मुदत संपलेल्या बाटल्या आढळून आल्याबाबत तक्रार करुनही केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. ही औषधे विद्यार्थ्यांना पाजण्याचा बेत होता. परंतु कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या शिक्षण मंडळाचे श्री. राकेश मुथा यांनी हे प्रकरण उघडकीस आणले.

यापूर्वी देखील अशा प्रकारची मुदत संपलेली औषधे महापालिकेच्या शाळेतील मुलांना पाजण्यात आली असल्याची शंका शहरातील जनतेमध्ये व्यक्त होत आहे. म्हणून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होणे गरजेचे असून संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. कल्याण-डोंबिवली महापालिका व राज्यातील इतर महापालिकांमध्ये सुध्दा अशा प्रकारे मुदत संपलेल्या औषधांचे वाटप करण्यात आले असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. शासनाने याबाबत काळजी घेण्याची आवश्यकता असून त्याबाबतचे आदेश शासनाने सर्व संबंधितांना द्यावेत. बिहारमध्ये विषबाधा झालेल्या घटनेनंतर आपल्या राज्यातील धुळे जिल्ह्यातील सिंदखेडा व बुलढाणा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त...

जिल्ह्यातील शेगांव येथे विषबाधा होण्याचे प्रकार घडलेले आहेत. तेव्हा अशा प्रकारच्या घटनांची राज्यामध्ये पुनरावृत्ती होऊ नये याकरिता शासनाने काळजी घेणे गरजेचे आहे यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे."

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : पुणे शहरातील परिवहन कार्यालयात कर्मचा-यांची पदे भरण्याची आवश्यकता याबाबत ॲड. जयदेव गायकवाड,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच[illegible] मांडतो.

"पुणे शहरात झपाट्याने वाढणारी वाहन संख्या पाहता पुण्याच्या प्रादेशिक कार्यालयात किमान 600 कर्मचा-यांची गरज असताना शासनाने मात्र केवळ 152 पदांना मंजुरी दिली असून त्यापैकी गतवर्षी सेवानिवृत्तीमुळे 37 पदे रिक्त झालेली असणे, त्यातच सेवानिवृत्तीमुळे आणखी पदे रिक्त होत राहणे, 600 पदांची आवश्यकता असताना केवळ 152 पदांना मंजुरी देणे व सेवानिवृत्तीमुळे कमी पदातच परिवहन कार्यालयाचा कारभार चालत असल्याने, मध्यस्थांचा (एजंटांचा) शिरकाव कार्यालयात झाल्याने कार्यालयाचे शासकीय कामकाज कोलमडण्याची शक्यता, याबाबत पुणे शहरातील परिवहन कार्यालयात पुरेशा प्रमाणात कर्मचा-यांची पदे भरण्यात यावीत अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे."

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य मार्गिकेमध्ये बसलेले असतात.)

**तालिका सभापती** : आता शासकीय विधेयके घेण्यात येतील. मी माननीय विरोधी पक्षनेते तसेच विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी आपापल्या जागेवर बसून सभागृहाच्या कामकाजामध्ये सहभाग घेऊन सहकार्य करावे.

मी सभागृहाची बैठक दुपारी 12.50 पर्यन्त स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.39 ते 12.50 पर्यंत स्थगित झाली. )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी )

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 30 मिनिटांपर्यंत स्थगित करण्यात येत आहे. त्यानंतर सभागृहापुढील कामकाजास सुरुवात करण्यात येईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.51 ते 01.30 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-----------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

**पृ.शी.**: शासनाच्या भूमिकेमुळे सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत राज्यातील कोट्यवधी जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम

**मु.शी.**: शासनाच्या भूमिकेमुळे सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत राज्यातील कोट्यवधी जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम, या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम जयंत प्र. पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवान साळुंखे वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विधिमंडळाच्या कामकाजाबद्दल सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यामध्ये संघर्ष होत असतो, काही विषयांच्या बाबतीत वादावादी होत असते. विरोधी पक्षाकडून जनतेच्या हिताच्या दृष्टीने भूमिका घेतली जात असते. सत्ताधारी बाजूकडून सिंचनाच्या विषयावर चर्चा करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली. सिंचनाच्या विषयावर चर्चा करीत असताना जे नॉर्म्स माननीय सभापतींनी ठरवून दिले आहेत त्या अंतर्गत आपण चर्चा करणार आहोत. शासनाच्या या सकारात्मक भूमिकेनंतर आम्ही सभागृहात धरणे आंदोलन सुरु केले होते ते रद्द करीत आहोत.

माननीय सभापतींच्या दालनात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन करण्यात आले आहे, त्या संदर्भात त्यांनीही माननीय सभापतींना पत्र देऊन त्यांचा निर्णय अंतिम असल्याचे मान्य करुन घडलेल्या प्रकाराबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. आम्ही माननीय सभापतींना विनंती केली की, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन रद्द करण्यात यावे. आम्हाला आशा आहे की, त्यांचे निलंबन मागे घेण्यात येईल. माननीय सभापती हे सभागृहाचे प्रमुख आहेत, पालक आहेत. त्यांच्या दालनात जो प्रकार घडला त्याबद्दल ते क्षमा करतील अशी मला खात्री आहे. अधिवेशनाच्या कालावधीतील हा शेवटचा आठवडा

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

आहे. जनतेच्या दृष्टीने अनेक महत्वाच्या विषयांवर चर्चा घडवून आणावयाची आहे. त्या विषयांवर विरोधी पक्षाला आपली मते मांडावयाची आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी भूमिका मांडली आहे त्या भूमिकेबद्दल समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मागील दोन-तीन दिवस सभागृहामध्ये सिंचनाच्या विषयावर चर्चा व्हावी म्हणून विरोधी पक्षाकडून जो आग्रह धरला होता त्या अनुषंगाने जो पेच निर्माण झाला होता, तो सोडविण्यात काही अंशी यश आले आहे असे म्हणावयास हरकत नाही. लोकशाही व्यवस्थेमध्ये जनतेच्याकडून कर रुपाने घेतलेला पैसा योग्य प्रकारे वापरला गेला पाहिजे ही भूमिका विरोधी पक्षाची होती. त्या अनुषंगाने सिंचनाच्या विषयावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे. मी माननीय सभापतींना मनापासून धन्यवाद देतो. सभागृहाच्या नेत्यांनी सिंचनाच्या विषयावर चर्चा करण्यास संमती दर्शविली त्याबद्दल मी त्यांनाही मनापासून धन्यवाद देतो. खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा करण्याची या सभागृहाची परंपरा आहे. सभापती महोदय, आपण सभापतीस्थानी आसनस्थ असल्यानंतर सभागृहात आनंदी वातावरण निर्माण होत असते. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते उद्वेगाने जरी काही बोलले असले तरी ते फणसाच्या गऱ्यासारखे आहेत. त्यांच्या मनामध्ये काही नसते. झालेली चूक ते ताबडतोब मान्य करतात. कारण ते कोकणातील, विशेषत: अलिबागचे आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि आमच्या सहकाऱ्यांनी सभागृहाचे कामकाज व्यवस्थित चालावे व जनतेचे प्रश्न चर्चेने सुटावेत या दृष्टीने जी भूमिका घेतली त्यांच्या या भूमिकेला मी समर्थन देतो.

---------

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक

L.A. BILL NO. XXVII OF 2013.

(A BILL TO PROVIDE FOR PROHIBITION OF ESTABLISHMENT OF UNAUTHORIZED INSTITUTIONS AND INTRODUCTION OF UNAUTHORIZED COURSES OF STUDY IN AGRICULTURE, ANIMAL AND FISHERY SCIENCES, HEALTH SCIENCES, HIGHER TECHNICAL AND VOCATIONAL EDUCATION IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 27 महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे विधानसभा विधेयक क्रमांक 27 महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर ओ.1...

श्री.डी.पी.सावंत ......

सभापती महोदय, उच्च शिक्षणामध्ये अनेक अनाधिकृत संस्था आढळून आल्याच्या तक्रारी गेल्या गेल्या तीन चार वर्षाच्या अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्नोत्तरे तसेच लक्षवेधी सूचनेमार्फत सभागृहात उपस्थित करण्यात आल्या होत्या. त्यामुळे अनाधिकृत शैक्षणिक संस्थांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधक उपाय म्हणून ठोस कायदा करण्याची गरज होती. या गरजेला अनुसरुन विभागाने कायदा तयार केलेला आहे. मला आनंद आहे की, संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्यानेच यासंदर्भात प्रतिबंध कायदा तयार केलेला आहे.

सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICT) दर वर्षी अनाधिकृत संस्थांची यादी घोषित करीत असते. परंतु ट्रेनमधून जातांना, बसमधून जातांना छोटया छोटया कोर्सेसला एआयसीटीची मान्यता आहे अशा खोटया जाहिराती दिसतात. या खोटया जाहिरातींना मोठया प्रमाणात विद्यार्थी बळी पडत असतात. परंतु खोटया जाहिरातींना विद्यार्थी बळी पडलेले आहेत हे उशिरा समजते. तोपर्यंत विद्यार्थ्यांनी कोर्सेसाठी पैसे भरलेले असतात. हे जेव्हा समजते तेव्हा खूप उशीर झालेला असतो, तोपर्यंत अभ्यासक्रमाला सुरुवातही झालेली असते. विद्यार्थी जेव्हा परीक्षेला बसतात तेव्हा या संस्थेला एआयसीटीची मान्यता नाही, ही संस्था बोगस आहे हे कळते.

सभापती महोदय, बोगस संस्थांना प्रतिबंध करण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने राज्यातील अनाधिकृत संस्थांच्या बाबतीत यादी घोषित केली होती. यासंदर्भात प्रथमत: श्री. दिनेश कामत विरुध्द महाराष्ट्र शासन याबाबत मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्रमांक 117/2005 दाखल करण्यात आली होती. या याचिकेमध्ये अनेक संस्थांची यादी एआयसीटी ने जाहीर केली होती. अशा ज्या बोगस संस्थां आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे कोर्टाने आदेश दिले् होते. कोर्टाच्या आदेशा प्रमाणे या संस्थावर फौजदारी कारवाई करण्यात आली होती. परंतु असे कोणतेही कलमे नसल्यामुळे या संस्थांवर प्रतिबंध बसू शकला नाही. अशा बोगस संस्थांना प्रतिबंध करण्यासाठी स्वतंत्रपणे कायदा केला जाईल यांसदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सन 2010 मध्ये विधानसभेत घोषणा केली होती. या कायद्यासाठी आपण जेव्हा शासनाकडे गेलो

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत ......

तेव्हा मंत्री मंडळाच्या उप समितीने सांगितले की, यामध्ये केवळ उच्च व तंत्रशिक्षणचाच नाही तर कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण असे उच्च शिक्षणाचे जे काही विभाग आहेत, ज्या ठिकाणी उच्च शिक्षण दिले जाते अशा सर्व संस्थांना एकत्र करुन कायदा अंमलात करावा व त्या प्रमाणे आपण या ठिकाणी कायदा आणलेला आहे. बोगस संस्थांना प्रतिबंध करण्यासाठी संपूर्ण देशात महाराष्ट्रानेच कायदा केलेला असल्यामुळे या कायद्याला सभागृहाने संमती द्यावी अशी विनंती करतो.आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 21 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 27 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 27 संमत झाले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेले नियम 260 अन्वयेचे दोन्ही प्रस्ताव पुढे ढकलण्यात येत आहेत. तसेच दोन्ही अर्धा तास चर्चा देखील पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझी एकच विनंती आहे की, अधिवेशन सुरू होऊन दोन आठवडे झाले आहेत. पण एकही अर्धा-तास चर्चा झालेली नाही. आपण अर्धा-तास चर्चेसाठी एक दिवस द्यावा. आम्ही अर्धा-तास चर्चेसाठी सकाळी येण्यास तयार आहोत. आपण अर्धा-तास चर्चेला न्याय द्यावा अशी मी विनंती करीत आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेले म.वि.प.नियम 260 अन्वयेचे प्रस्ताव पुढे ढकलण्याचा निर्णय आपण दिलेला आहे. माझी आपणास विनंती आहे की, माझ्या विभागाशी संबंधित असलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव दोन वेळा पुढे ढकलला असल्यामुळे किमान तो प्रस्ताव उद्या तरी चर्चेला घ्यावा.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. मंगळवार, दिनांक 30 जुलै 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक होईल. या विशेष बैठकीमध्ये सकाळी 10.00 ते 11.45 या वेळेत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 42 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 30 जुलै 2013 च्या सकाळी 10.00 वाजे पर्यंत स्थगित झाली.)

................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही